# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- डॉ. जयंती आंबेगावकर

---

गर्जा जयजयकार, सूरांनो
गर्जा जयजयकार !!

सुश्रवण नादा, सूर बोलती,
तालासवे लयीची प्रीती |
सूर, ताल, नृत्य मिळूनी,
संगीत कलाविष्कार ||
गर्जा जयजयकार, सूरांनो
गर्जा जयजयकार !!

गेय कविता गीत बनते,
सूरात भिजूनी संगीत बनते |
देती तृप्तता कानांना ती,
सोडूनि अमृत धार ||
गर्जा जयजयकार....

सूरासूरांचे रूप वेग |
प्रत्येकाचे स्वभाव आगळे |
गुणधर्माने शब्दां लिंपून,
करती हे उपचार ||
गर्जा जयजयकार...

भक्तिसूरांना देव भेटतो,
तालासंगे देव नाचतो |
टाळांसंगे कधी पावली,
कधी तांडव डमरूवर,
कधी हृदयी तारझंकार ||
गर्जा जयजयकार...

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सप्तसुरांची नाती जुळती,
सप्त चक्र, रंग, गंधाशी |
सुर करती काम चोख अन,
करती औषधोपचार ||
गर्जा जयजयकार...

'सा' चे चक्र मुलाधार,
स्वाधिष्ठाना 'रे' आधार |
मणिपुराचा गांधारावर,
अनाहताचा 'म' वर भार ||
गर्जा जयजयकार...

विशुध्द चक्रा पंचम आवडे
आज्ञा झुके धैवतापुढे |
निषादाचा ताज सहस्रारला,
मंत्र उच्चारी ओंकार ||
गर्जा जयजयकार, सुरांनो
गर्जा जयजयकार !!

Anahat Music Therapy